# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## जाहीर प्रकटन २०२३-२४

केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणा-या नागरी सेवा (Civil Services Examination) परिक्षांना बसणा-या विद्यार्थ्यांना निःशुल्क मार्गदर्शन करणे या उद्देशाने, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, पिंपरी - ४११ ०१८ येथे सन २०२२-२३ पासून नव्याने सावित्रीबाई फुले अकादमी सुरु करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले अकादमी या संस्थेकरीता संचालक या पदासाठी १ वर्ष कालावधीकरीता करार पद्धतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त शासकीय अधिकारी, तज्ञ यांच्या सेवा उपलब्ध करणेसाठी पात्र व इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज संबंधीत मुळ प्रमाणपत्र व संबंधीत प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रतिसह दि.०४/०१ /२०२४ रोजी सकाळी १२.०० वा थेट मुलाखतीसाठी मा.आयुक्त यांचे कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८ येथे उपस्थित रहावे.

| पदनाम | वयोमर्यादा | मासिक परिश्रामिक | एकूण जागा | पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|---|
| **संचालक** - सावित्रीबाई फुले अकादमी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका | कमाल ६५ वर्ष | महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२७१५ /प्र.क्र. १०० /१३ दि. १७ डिसेंबर २०१६ आणि सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२७१५ /प्र.क्र. १००(भाग १) /१३ दि. ०८ सप्टेंबर २०२३ अन्वये देय मासिक परिश्रामिक (शासन निर्णयातील ड(१) (क) च्या अनुषंगाने | ०१ | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी<br>२) MPSC परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३) ग्रेड पे ५४०० अथवा ६६०० संवर्गीय सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी असणे आवश्यक.<br>४) स्पर्धा परिक्षा संबंधी ज्ञान असलेल्या उमेदवारांस प्राधान्य |

सदरची संपूर्ण जाहीरात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर अटी व शर्तीसह प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी संकेत स्थळावर प्रसिद्ध केलेल्या जाहीरातीत नमुद अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचून त्यानुसार पात्र व इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज मुळ प्रमाणपत्र व प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रतीसह थेट मुलाखतीसाठी मा.आयुक्त यांचे कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८ येथे दि. ४ /०१ / २०२४ रोजी सकाळी १२.०० वा. उपस्थित रहावे.

**संचालक, सावित्रीबाई फुले अकादमी या पदाकरीता अटी व शर्ती**

१) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे वय ६५ वर्षाहून अधिक नसावे.

२) स्वेच्छा / सेवानिवृत्त अधिकारी यांचा सेवानिवृत्त झाल्याचा कालावधी ७ वर्षपेक्षा अधिक नसावा.

३) सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

४) सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुद्ध त्यांच्या शासकीय सेवा कालावधीतील कामकाजाबाबत कोणत्याही प्रकारचे विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी अथवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे.

५) करार पद्धतीने निवड करावयाच्या अधिकारी यांनी विहित नमुन्यात वचनपत्र भरुन देणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर संपूर्ण तपशील व अर्जाच्या नमुना प्रसिद्ध करण्यात आला असून उमेदवाराने अर्ज सादर करण्यापुर्वी संकेत स्थळावरील जाहीरात काळजीपुर्वक वाचावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

जाहिरात क्रमांक - ९/२०२३-२४
क्रीडा विभाग
क्र.क्रीडा/०६/कावि/६५/२०२३
दि.२२/१२/२०२३